VICE CHANCELLOR RESEARCH MOTIVATION SCHEME

(VCRMS)

Supported by the University

# An analytical study with social work perspective to the changing economies of the tribes and the impact on their traditional lives.

## (Special reference: Pal area, Raver Tahasil District Jalgaon)


Submitted by

**NITIN RAMDAS BADGUJAR**

DNCVP'S

Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work, Jalgaon



चौधरी

कार्यालय

30/10 २०१९


Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित
# लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव
७८/५, शंकरराव नगर, जुना खेडी रोड, जळगाव
फोन : ०२५७-२२२१३०२ ई-मेल : cswjal@gmail.com

जा.क्र. सीओएसडब्ल्यु/२०१९-२०/१७८ दिनांक : 30 OCT 2019

प्रति,
मा. उपकुलसचिव सो
(विकास विभाग)
क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव

विषय : कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजना या अर्थशिर्षांतर्गत प्रस्ताव सादर करणेबाबत...

संदर्भ : कबचौउमवि/११ए/ अर्थसंकल्प-२०१९-२०/ VCRMS/३४५/२०१९ दि. ०४/१०/२०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये धनाजी नाना चौधरी विद्याप्रबोधिनी संचलित मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव येथील कबचौउमवि अंतर्गत महाविदयालयातील शिक्षकांच्या संशोधन कार्यांस प्रोत्साहन मिळण्याकरीता `कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजना` अंतर्गत प्रा. डॉ. नितिन रामदास बडगुजर इ सहा. प्राध्यापक यांचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस सविनय सादर.

धन्यवाद !

सोबत - प्रस्तावासह नियुक्ती पत्र
कायम सेवेत असल्याचा दाखला
४१५(१) अन्वये मान्यता दिलेल्या पत्राची प्रत

डॉ. वाय. जी. महाजन
प्र. प्राचार्य

ACTING PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon

DHANAJI NANA CHAUDHARI VIDYA PRABODHINI'S ... Jalgaon

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित
लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव
७८/५, शंकरराव नगर, जुना खेडी रोड, जळगाव
फोन : ०२५७-२२२१७०२ ई-मेल : cswjal@gmail.com

जा.क्र. सीओएसडब्ल्यु/२०१९-२०/१३८ अ दिनांक : 30 OCT 2019

# EXPERIENCE CERTIFICATE

This is to certify that **Asst. Prof. Dr. Nitin Ramdas Badgujar** has been working as Asst. Professor in DNCVP's Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work, Jalgaon. He is Permanent Teacher teaching at Graduate and Post Graduate Classes in college of Social Work, Jalgaon since **15/05/2009** till date.

ACTING PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित

**लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, जळगाव**

७८/५, शंकरराव नगर, जुना खेडी रोड, जळगाव

फोन : ०२५७-२२२१३०२ ई-मेल : cswjal@gmail.com

जा.क्र. सीओएसडब्ल्यु/२०१९-२०/१३८ब

दिनांक : 30 OCT 2019,

## To Whomsoever it may concern

This is to certify that Mr. Nitin Ramdas Badgujar is working as Assistant Professor in the subject of Social Work at Dhanaji Nana Chaudhari Vidya Prabhodhini's Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work, Jalgaon since 15/05/2009. He is approved by the North Maharashtra University, Jalgaon and permanent faculty of this college.

DHANAJI NANA CHAUDHARI VIDYA PRABODHINI'S Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work Jalgaon

ACTING PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon

CS CamScanner

# VICE –CHANCELLOR RESEARCH MOTIVATION SCHEME

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Faculty | : | Humanities |
| | Broad Subject | : | Social Work |
| 2. | Area of specialization | : | An analytical Study with Social work perspective to the changing economies of the tribes and the impact on their traditional lives.<br>( Special reference: Pal area, Raver Tahasil District Jalgaon ) |

**3. Principal Investigator:**

| | | | |
|---|---|---|---|
| (i) | Name | : | Nitin Ramdas Badgujar |
| (ii) | Date of Birth | : | 01/06/1974 |
| (iii) | Qualification | : | MSW, NET, M.Phil, Ph.D. |
| (iv) | Address | : | 36/B Adarsh nagar, Mohadi road, Near lion's Hall, Jalgaon 425001 |
| (v) | Office Phone no | : | 02572221302 |
| | Residence Phone no | : | 8329697677 |
| | Mobile no | : | 9423488334 |
| | Email Id | : | badgujarni3@gmail.com |

**4. Teaching Experience of Principal Investigator:**

(a) Teaching Experience : UG 10 Yrs

PG 10 Yrs

(b) Research Experience of Principal Investigator : 10 Years.

(c) In case of Teacher holds a Doctoral degree :

(i) Title of Thesis : महाराष्ट्र शासन अंगीकृत जलस्वराज्य प्रकल्पाचे ग्रामीण विकासातील सहभागाचे अद्ध्ययन संदर्भ जळगाव जिल्हा



CamScanner

(ii) Year of the Award of Degree : 2017

(iii) Name of the University : Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(d) Publication, if any : Yes

5. **Papers with Impact Factor, Citation Index, ISSN No.etc:**

(i) Published: (ii) Accepted: (iii) Communicated:

**Separate sheet is attached.**

**Books**

(i) Published: 01 (ii) Accepted: - (iii) Communicate -

6. **Name of the place where the project will undertaken:**

(a) School/Department/Institute

(b) College/Institute : Dhanaji Nana Chaudhari Vidya Prabodhini's Loksevak Madhukarrao Chaudhari College of Social Work, Jalgaon

7. **Whether the College/Institute is approved**

**Under Section 2(F) and 12(B) of the UGC Act 1956? : Yes**

8. **Whether the College/Institute is aided or Non aided : Yes**

9. **(A) Title of Proposed R & D Project:**

**आदिवासींच्या बदलत्या अर्थव्यवस्था आणि त्यांच्या पारंपारिक जीवनावर होणारा परिणाम : समाजकार्य दृष्टिकोनातून चिकित्सक अध्ययन (विशेष संदर्भ : पाल परिसर ता. रावेर, जि. जळगाव)**

**(An analytical Study with Social work perspective to the changing economies of the tribes and the impact on their traditional lives.**

**( Special reference: Pal area, Raver Tahasil District Jalgaon )**

(i) **Introduction (प्रस्तावना)**

भारत हा एक प्राचीन देश आहे. भारतातील आदिवासी ही प्राचीन जमात आहे. सुरुवातीच्या काळापासून आदिवासींचे जीवन हे संघर्षमय राहील असून तशा प्रकारचे जीवन जगणे हा त्यांचा पारंपारिक स्थायीभाव राहीला आहे. जंगलात, डोंगरदऱ्यात, निसर्गाच्या



CamScanner

सान्निध्यात आणि आधुनिक म्हणवल्या जाणाऱ्या जगापासून अलिप्त आणि निकोप जीवन जगणारे आदिवासी खडतर व संघर्षमय जीवन जगत असले तरी तो आदिवासींच्या संस्कृतीचा व परंपरांचा भाग आहे. अशा आदिवासींच्या विकासाच्या नावाखाली अतिशय प्राचीन अशा संस्कृतीवर व जीवनमानावर कुऱ्हाड उगारणाऱ्या जगाशी आदिवासींचा कमी-अधिक प्रमाणात वारंवार संपर्क असल्याने त्यांच्या जीवनात अनेक बदल झालेले आतमितीस दिसून येतात. आज जंगले शहरांशी जोडली जात आहेत त्यामुळे घनदाट जंगलात राहणारा आदिवासी आज शहराच्या जवळ येताना दिसतो आहे. काळाची गरज आणि विकासाची ओढ म्हणून जरी ही प्रक्रिया होत असली तरी आदिवासींचे पारंपारिक जीवन, संस्कृती यामध्ये अमुलाग्र बदल होताना दिसत आहे. उपरोक्त स्थिती ही सर्वच आदिवासींच्या जमातीमध्ये दिसून येत नसली तरी काही प्रमाणात त्यांची सुरूवात मात्र नक्की झालेली आहे.

काळाच्या ओघात आणि मानवाच्या अतिरेकी हव्यासापोटी जंगलांची मोठ्या प्रमाणावर झालेली कत्तल, जागतिकीकरणातील बदल आणि जागतीक हवामान बदलामुळे निसर्गात झालेले बदल या सर्व बाबींचा आदिवासींच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनावर मोठा परिणाम झाला आहे. आदिवासींचे राहणीमान, व्यवसायांचे स्वरूप, उपजिवीकेचे साधन यातही मोठ्या स्वरूपात बदल झाले आहे. जंगलात राहून कंदमुळे, फळे गोळा करून, प्राण्यांची शिकार करून, फुले गोळा करून आपली उपजिवीका भागवणारे आदिवासी आज जंगलातील लाकडे गोळा करूा त्यांच्या मोळ्या बनविणे, त्या शहरात जाऊन विकणे, गाई, म्हशी पाळणे, शहरात जाऊन दुग्धव्यवसाय करणे् शेतमजूरी करणे, स्वत:ची शेती करणे याबरोबरच शहरात जाऊन मोलमजूरी करून तेथेच वास्तव्य करणे यासारख्या व्यवसायांमध्ये बदल होताना दिसतो आहे. यापुढे जाऊन शहरातील वास्तव्य वाढवून स्वत:चे व्यवसाय करणे, वनविभागात नोकरी करणे इ. माध्यमातून आदिवासींचे पारंपारिक जीवन बदलून ते नवीन अर्थव्यवस्थेशी जोडले गेले आहेत. पारंपारिक व्यवसाय हा हळूहळू कमी होऊन आदिवासी आधुनिक जीवनशैलाचा घटक बनत चालला आहे. या प्रवृत्तीचा वेग हा सद्यस्थितीत फार नसला तरी बहुतांश आदिवासींचा कल या दिशेने वाढत आहे.

सुरूवातीच्या काळात स्थीर झालेला आदिवासी हा आज मात्र अस्थिर स्वरूपाचे जीवन जगत आहे. आदिवासी हा मुळात कष्टाळू व मेहनती असताना, अल्पसंतुष्टी परिस्थितीत जीवन जगताना आज उपजिवीकेसाठी परावलंबी झालेला दिसून येतो. स्वयंपूर्णता असलेल्या आदिवासी पाड्यांमधील आदिवासींना कर्जबाजारीपणाची समस्या देखील भेडसावते. अर्थव्यवस्था आणि कर्जबाजारीपणा यांचा जवळचा संबंध आहे. त्या अनुषंगाने बदलत्या रोजगारांमुळे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत स्थीर नसल्याने वरचेवर सावकारांकडून कर्ज घेणे गरजेचे बनते व त्यातून आर्थिक समस्यांमध्ये अधिक भर पडताना दिसते. शासनाच्या वनविषयक धोरणांचा प्रतिकूल परिणाम आदिवासींवर होतो. वनविषयक नियमावली कडक असल्याने जंगलात जीवन जगणे कठीण झाल्यामुळे त्यांचे शहरात स्थलांतर झाले. साहजिकच स्थलांतरामुळे रोजगाराचे स्वरूपदेखील बदलले. मात्र जीवन



CamScanner

जगण्याच्या इच्छेपोटी कर्ज घेऊन का होईना जगणे महत्त्वाचे असल्याने कष्टप्राय जीवन व्यतीत करताना दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही दुर्दैवाने जंगल कायद्यांमध्ये हवी ती सुधारणा झाली नाही. शासनाने एकांगीपणाने निर्णय घेतले. आदिवासींच्या जीवनपद्धतीचा विचार न करता कल्याणकारी योजना सक्तीने त्यांच्यावर लादण्यात आल्या. आदिवासींच्या जबरदस्तीचा पुनर्वसनामुळे त्यांची पारंपारिक सामुहिक जगण्याची पद्धती मोडीत निघाली. सामुहीक देवाण-घेवाण कमी होऊन व्यक्तिगत हीताला प्राधान्य आल्याने आदिवासींच्या पारंपारिक व समुहिक जीवन मोडकळीस आले.

पैसे मिळविणे ही आदिवासींची गरज बनल्याने रोजगार हमी योजनेसारख्या माध्यमातून गरज भागविणे गरजेचे बनले परंतू अंमलबजावणीच्या पारदर्शक अभावामुळे आदिवासींना फायदा तर झालाच नाही उलट ठेकेदार, संबंधित अधिकारी यांच्या अतिरेकी मध्यस्थीमुळे आदिवासींच्या आर्थिक स्त्रोतांची मात्र फरफटच झाली. शहरी भागात बांधकाम क्षेत्रात मजूरांची मोठ्या प्रमाणावर गरज असल्याने अल्पदरातील मजूर म्हणून आदिवासींना प्रलोभने दाखवून स्थलांतरीत केले. पारंपारिक अर्थस्त्रोत सोडून कुटुंबासह आदिवासी स्थलांतरीत झाला परंतू अल्प उत्पन्नामुळे महागाईचा सामना करणे कठीण बनले. काम संपेपर्यंत मजूरी न मिळणे, ठरल्याप्रमाणे मजूरी न मिळणे, काम संपल्यानंतर कामावरून काढून टाकणे इ. बाबींमुळे त्यांच्या पारंपारिक जीवनावर मात्र अत्यंत प्रतिकूल परिणाम होताना दिसतो. याशिवाय कुटुंबातील आदिवासी स्त्रियांची छेड काढणे, शारीरिक शोषण करण्यासारखे वाईट परिणामदेखील दिसून येतात.

केवळ महाराष्ट्र राज्याचा आर्थिक धोरणानुसार आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात ९% आर्थिक तरतूदी आहेत. परंतू ९% आर्थिक तरतूद त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. उदा. दाखल २०१०-११ सालच्या आर्थिक तरतूदी अंतर्गत मुलभूत सुविधा अपेक्षित असताना गावात शाळा, रस्ता, वाहतुकीच्या सोयी, आरोग्य, पिण्याचे स्वच्छ पाणी आदिवासी पाड्यापर्यंत पोहोचणे अपेक्षीत आहे. परंतू वास्तव निराळेच असलेने रोजगारासाठी मात्र गाव, वस्ती, पाडा सोडणे अनिवार्य बनते. याचाच अर्थ शासनाच्या आदिवासींसाठी आर्थिक धोरणांचादेखील त्यांच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होताना दिसतो.

आदिवासींच्या बदलत्या अर्थव्यवस्थेसंदर्भात उपरोक्त बाबींव्यतिरिक्त इतर अनेक बाबी या त्यांच्या पारंपारिक जीवनावर परिणाम करणाऱ्या ठरत आहेत. त्यात प्रामुख्याने जागतिकीकरण, खुले आर्थिक धोरण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, तथाकथीत `विकास` च्या नावाखाली आदिवासंच्या जीवनपद्धतीच बदलून टाकणाऱ्या अनेक बाबींचा उहापोह करता येणे शक्त आहे. संशोधकाने प्रस्तूत अध्ययनातून प्रामुख्याने जळगाव जिल्ह्यातील सातपूडा पर्वतरांगांमध्ये वास्तव्य करणाऱ्या रावेर तालुक्यातील पाल व परिसरातील आदिवासींचा अभ्यास हाती घेतला आहे. सदर परिक्षेत्रांतर्गत जंगल संपत्ती बहुतांश नामशेष होण्याच्या मार्गावर असून तेथील आदिवासी आज आर्थिक उपजिवीकेसाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतरीत होताना दिसत आहे. त्या अनुषंगाने सदर जमातींचा अभ्यास करण्यात येणार असून त्यादृष्टीने संशोधक आपले संशोधन पूर्ण करणार आहे.



CamScanner

(ii) **Significance of the Study (अध्ययनाचे महत्त्व)**

आदिवासी भागातील अर्थव्यवस्था ही भारतीय अर्थ व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आदिवासींचे पारंपारिक व्यवसाय, गाव, पाडा, वस्ती, वाडा याममधील आर्थिक देवाण-घेवाण, आर्थिक स्वयंपूर्णता, मर्यादित जीवनशैली, मर्यादित गरजा यासारख्या वैशिष्ट्यांमुळे स्थीर स्वरूपात व पारंपारिक जीवनशैलीत जीवन जगणारा आदिवासी मात्र २१ व्या शतकात मात्र पूर्णत: अस्थिर होताना दिसत आहे. बदलत्या आर्थिक व्यवस्थेकडे आदिवासींच्या पारंपारिक जीवनावर प्रतिकूल परिणाम दिसून येत आहेत. आदिवासींच्या पारंपारिक जीवनाचा आणि त्यांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करताना लक्षात येते की, अर्थव्यवस्थेचे मुख्य उद्देश व किमान गरजांची पूर्तता करणे हा आहे. परंपरांना शिरसावंद्य मानून चरितार्थ चालविणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. कंदमुळे, फळे, डिंक गोळा करणे, मासेमारी करणे, शिकार करणे, पोटापुरती शेती करणे, पशुपालन, दुध संकलन करणे, विक्री करणे इ. वर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेची जागा काळाच्या प्रवाहात बदलत गेली. आदिवासी समुदायात अनेक स्थित्यंतरे झाली. त्याचा परिणाम त्यांच्या पारंपारिक जीवनावर प्रामुख्याने झाला. शेतीचे पारंपारीक स्वरूप बदलले, सामुहीक व स्थानांतरीत शेतीऐवजी आधुनिक शेती आली. जंगलाचा झपाट्याने झालेला ऱ्हास यामुळे कुटुंबाची उपजिवीकेचा मार्ग बदलला. कुटीरोद्योगाची जागा शहरातील कारखान्यांमधील मजूरांमध्ये झाली. एकेकाळी आदिवासींचे हस्तव्यवसाय हे उदरनिर्वाहाचे असलेले साधन हे पारंपारिक संस्कृती जपण्यापर्यंत मर्यादित झाले. शासनाच्या योजनांवरील अवलंबीत्व (रोहयो) केवळ मृगजळ ठरले. जंगलाचा राजा असलेला आदिवासी २१ व्या शतकात मात्र केवळ मजूर म्हणून जीवन जगतांना दिसतोय. स्थलांतरामुळे आदिवासींच्या जीवनातील स्थिरता कमी होऊन वणवण मात्र वाढली. उपरोक्त बाबींचा प्रस्तुत अध्ययनात विशेश महत्त्व आहे. आविासी जंगलातून शहराकडे स्थलांतरीत होताना त्यांची संस्कृती लोप पावत चालली आहे याची जाण असून देखील जीवन जगणे हे जास्त महत्त्वाचे असलेने आदिवासींचे पारंपारिक जीवन व संस्कृतीवर गंडांतर येत आहे.

उपरोक्त बाबींचे संशोधक म्हणून विचार करताना लक्षात येते की, बदलत्या वातावरणामुळे जसे अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलले तसेच त्याचे विविध दूरगामी परिणाम देखील अनुभवास येऊ लागले. आदिवासींची प्राचीन जीवन जगण्याची पद्धती, संस्कृती, लोककला, लोकसंगीत, आदिवासींमध्ये पारंपारिक असलेल्या कलाकुसरीच्या बाबी, हस्तव्यवसाय, सण, उत्सव यावर मात्र मर्यादा आल्या. भारताचे महत्त्वाच्या असलेल्या वैशिष्ट्यांवर बदलत्या आदिवासींच्या अर्थव्यवस्थेमुळे मर्यादा आली. पारंपारिक जीवन बदलून त्याची जागा आधुनिक व सर्वसाधारण जीवनपद्धतीने घेतली.

वरील बाबींशिवाय संशोधकाचा अभ्यास विषयात प्रामुख्याने या बाबींचा देखील परामर्श महत्त्वाचा आहे की, पारंपारिक जीवन बदलताना आदिवासींच्या जीवनात सकारात्मक बदल कमी होऊन प्रतिकूल परिणाम हे अधिक होताना दिसतात त्यात जंगलाचा राजा असणारा आदिवासी हा शेतमजूर, बांधकाम मजूर, कारखान्यातील हंगामी कामगार,

ऊपरे कामगार, ऊसतोडे कामगार, खाण कामगार, छोटा-मोठा व्यवसायिक यापेक्षा जास्त प्रगती त्यांची होताना दिसत नाही. बोटावर मोजण्याइतके आदिवासी जमातीमधील लोक हे सन्मानाने जीवन जगताना दिसतात. जंगलाचा होणारा ऱ्हास, औद्योगिकीकरण, पारंपारिक कुटीरोद्योग, परस्परांमधील व्यवहार कमी झालेले आदिवासी रोजगारासाठी स्थलांतरीत झाला. मात्र तो विकसित झाला नाही. उलटपक्षी तो त्याचे सामुहीक व पारंपारिक जीवन घालवून बसतो आहे. उपरोक्त बाबींचे वास्तवचित्रण व समाजासमोर आणणे हे संशोधनाचे महत्व आहे.

शासन व धोरणकर्ते यांचे दृष्टीने सदर अध्ययनास विशेष महत्त्व आहे कारण सदर संशोधनातून आदिवासींसाठी धोरण निश्चित करताना आदिवासींच्या वास्तविक जीवनशैलीचा, झालेल्या बदलांचा, प्रतिकूल परिणामांचा परामर्श होणे शक्य होईल. आदिवासी क्षेत्रात आणि विशेषत: अर्थव्यवस्थेशी संबंधित असलेली शासकीय प्रणाली, प्रशासकीय विभाग, आदिवासी विकास विभाग, आदिवासींसाठी असलेल्या योजना, प्रकल्प उपक्रम व कार्यक्रम ठरविताना सदरचे अध्ययन महत्त्वाचे ठरणार आहे.

आदिवासी क्षेत्रात संशोधन करणारे संशोधक अभ्यासकर्ता, समाजशास्त्र, भावी संशोधक, समाजकार्यकर्ते यांच्या संशोधन विषयाला, अध्ययनाला चालना मिळणेसाठी देखील सदर अध्ययन विशेष महत्त्वाचे आहे. याशिवाय सामाजिक शास्त्रातील समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, मानसशास्त्र, कृषी अर्थशास्त्र,मानववंशशास्त्र यासारख्या अभ्यासविषयक शाखांना देखील सदर अध्ययनाचे महत्व अनन्यसाधारण असे आहे.

उपरोक्त बाबींचा उहापोह करताना प्रस्तुत अध्ययनाचे महत्व हे आदिवासींच्या दृष्टीने देखील विशेष महत्वाचे आहे. आपली जीवनपद्धती परंपरा, संस्कृती, चालीरिती, पारंपारिक व्यवसाय, कौशल्ये इ. चे जतन व संवर्धन करणे उत्पन्नाचे स्त्रोत निवडणे तसेच योग्य व अयोग्याची निवड यासारखी देखील महत्वपूर्ण ठरणारे असे आहे.

**(iii) Objectives (अध्ययनाचे उद्देश)**

१) आदिवासींच्या पारंपारिक जीवनाचा आढावा घेणे.

२) आदिवासींच्या बदलत्या अर्थव्यवस्थांचा अभ्यास करणे.

३) बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे पारंपारिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

४) आदिवासींच्या विकासासाठी शासकीय प्रयत्नांचा अभ्यास करणे.

५) आदिवासींचे अर्थव्यवस्था सुधारताना पारंपारिक जीवनाचे जतन व संवर्धनासाठी संतुलीत शक्तीस्थळांचा शोध घेणे व पर्यायी व्यवस्था सूचविणे.



CamScanner

(iv) Hypothesis (गृहीतके) :

संशोधनासाठी निर्माण केलेली गृहीतकृत्ये शास्त्रीय आधाराव तयार करण्यात आली आहे. संशोधनकर्ता समाजकार्य शिक्षण व्यवसायात कार्यरत असल्याने अध्ययनावरून संशोधकाने सदर विषयाच्या अनुषंगाने विविध चलांचा उपयोग करून त्यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी खालील गृहीत कृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

१) बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे आदिवासींची पारंपारिक जीवनपद्धती बदलली आहे.

२) जंगलाचा ऱ्हास, आधुनिकीकरण, औद्योगिकीकरण व रोजगारांच्या अनुभवामुळे आदिवासीची अर्थव्यवस्था बदलला आहे.

३) बदलत्या अर्थव्यवस्थेमुळे आदिवासींच्या प्राचीन संस्कृतीवर मर्यादा येतात.

४) शासकीय ध्येय धोरणांच्या निर्मितीत आदिवासींच्या प्रत्यक्ष सहभाग नसलेने अंमलबजावणीत अडथळे येतात.

५) आदिवासींचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग हा आदिवासींच्या पारंपारिक जीवन समृद्ध करण्यासाठीचा सकारात्मक पर्याय आहे.

(iv) Methodology & Plan of work (अध्ययनपद्धती) :

a) संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन आराखडा हा वर्णनात्मक पद्धतीचा वापरणार आहे. त्या अनुषंगाने जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील पाल परिसरातील आदिवासी बहुल १० गावे हे अभ्यासक्षेत्र निवडण्यात आले आहे. मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने आणि सहभागीय निरीक्षण साधनांचा वापर करून संशोधन करण्यात येईल. प्रस्तुत अध्ययन गुणात्मक व संख्यात्मक (Qualitative and Quantitative) मिश्र स्वरूपाचा राहील.

b) संशोधन विश्व :

प्रस्तुत अध्ययनाचे संशोधन विश्व म्हणून जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील आदिवासी बहूल गावातील आदिवासी लोक हे राहणार आहेत.

c) नमुनानिवड व पद्धती :

जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील १० गावांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येणार असून सदर गावातील कुटुंबांची निवड करण्यासाठी संभाव्यता नमुना निवडमधील बहुपदीय नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार असून त्या माध्यमातून एककांची निवड करण्यात येणार आहे.



CamScanner

d) संशोधन कालावधी

| अ.क्र. | विश्लेषण | कालावधी |
|---|---|---|
| १ | संदर्भ साहित्याचा आढावा | ०३ महिने |
| २ | मुलाखत अनुसूची | १ महिना |
| ३ | पायलट स्टडी | ३ महिने |
| ४ | संशोधन क्षेत्रभेटी व अभ्यास | २ महिने |
| ५ | तथ्य संकलनाची पूर्व तयारी | १ महिना |
| ६ | तथ्य संकलन | ३ महिने |
| ७ | तथ्य विश्लेषण व पृथःकरण | ३ महिने |
| ८ | अहवाल लेखन व अनुषांगिक बाबी | २ महिने |
| | एकूण | **१८ महिने** |

e) तथ्यसंकलन :

**प्राथमिक स्त्रोत** - मुलाखत अनुसूची, प्रत्यक्ष निरीक्षण

**दुय्यम स्त्रोत** - संस्करण, संपादन, वर्गीकरण, संकेतपुस्तिकेकडे, सारणीयन, आलेख व चित्रे, संगणीकीय मदत

**संदर्भ सूची :**


१) अजमेरा सूर्यकांत, पटले भरतसिंग, विसपुते रत्नाकर (२०१०), 'आदिवासी आणि ग्रामीण विकास', अथर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती,

२) अलोणी विवेक, बोधनकर सुधीर (१९९९). 'सामाजिक संशोधन पद्धती', अष्टविनायक प्रकाशन, नागपूर.

३) कुळकर्णी शौनक (२०१०). 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

४) खडसे भा. कि. (२००२). 'जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

५) नाडगोंडे गुरूनाथ (२००३). 'भारतीय आदिवासी', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

६) मा. सुनिता (१९८८). 'भारतीय समाजिक समस्या', अंशुल पब्लिकेशन, नागपूर.

७) मुराटकर रामचंद्र (१८५४). 'हाकरा', महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक, पुणे.

८) साडविकर संजय (२०१४). 'भारतीय आदिवासी जीवन आणि संस्कृती', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर




CS CamScanner

८) संकेतस्थळ - www.jalgaon.nic

www.mahararashtra.gov.in

www.wikipedia.org.

(B) **Financial Assistance required (Budget):**

| Sr,No | Item | Estimated expenditure(Rs.) |
|---|---|---|
| 1. | Traveling Boarding Expenses | 15000/- |
| 2. | Books , journals | 20000/- |
| 3. | Stationery | 5000/- |
| 4. | Field investigator (Honorariam) | |
| | (a) For Pilot Study (3 months @ Rs. 8000) | 24000/- |
| | (b) For Data Collection (3 months @ Rs. 8000) | 24000/- |
| 5. | Printing, Photocopy & Binding | 15000/- |
| 6. | Contingency | 10000/- |
| 7. | Other like analytical Charges etc. | 20000/- |
| | **Total** | 133000 |

**10. Whether the Teacher has received support for the Research Project from the KBC North Maharashtra University under major,minor or from any other agency? If so, please specify.**

**(i) Name of the agency from which assistance was approved : N.A.**

**(ii) Sanction letter No. and date under which the assistance was approved .N.A.**

**(iii) Amount approved and utilized. N.A.**

**(iv) Title of the project for which assistance was approved. N.A.**

**(v) In case the project was completed, whether the work on the project has been published. N.A.**

**(vi) If the candidate was working for the doctoral degree, whether the thesis submitted and accepted by the University for the Award of degree . N.A.**

**(vii) If the project has not been completed, please state the reasons. N.A.**

**11. (a) Details of the Project /Scheme completed or Ongoing with the Principal Investigator: N.A**

| Sr.No. | Name of the Agency | Started year | Completed/Ongoing | Equipment/Infrastructural facilities obtained |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(b) List of facilities that will be extended to the investigator(s) by the implementing institution



CamScanner

(c) Available equipment and accessories to be utilized for the project. N.A

12. Any other information which will be helpful for evaluation of the project:

Place: Jalgaon

Date: 30 OCT 2019

Asst. Prof. Dr. Nitin Ramdas Badgujar
Principal Investigator

Dr. Y. G. Mahajan
Acting Principal
PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon



CamScanner

# CERTIFICATE

This is to certify that

(a) General physical facilities, such as furniture/space etc. are available in the School/College /Department

(b) I shall abide by the rules governing the scheme in case, it assistance is provided to me from the KBC North Maharashtra University, Jalgaon, for the above project.

(c) I shall complete the project within the stipulated period. If I fail to do so and if the University is not satisfied with the progress of the research project, the University may terminate the project immediately and ask for the refund of the released amount with interest.

(d) The above research project is not funded by any agency and I have no any major project from state or national funding agency.

Place:

Date: 30 OCT 2019

**Asst. Prof. Dr. Nitin Ramdas Badgujar**
**Principal Investigator**

Jalgaon

**Dr. Y. G. Mahajan**
**Acting Principal**
ACTING PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon



CamScanner

# ENDORSMENT

Title of the project : An analytical Study with Social work perspective to the changing economies of the tribes and the impact on their traditional lives.

(Special reference: Pal area, Raver Tahasil District Jalgaon)

Name of the Principal Investigator : Nitin Ramdas Badgujar

It is certified that the equipment and other basic facilities and administrative facilities as per terms and conditions of the project will be extended to the Principal Investigator throught the duration of the project.

School/College/Institute assumes to the financial and other management responsibilities of the project and the responsibilities of submitting Grant Utilization Certificate and completion/progress report to the University not later than 30th May of the next financial year or the date prescribed by University.

Place: Jalgaon

Date: 30 OCT 2019

Asst. Prof. Dr. Nitin Ramdas Badgujar
Principal Investigator

Dr. Y. G. Mahajan
Acting Principal

ACTING PRINCIPAL
Loksevak Madhukarrao Chaudhari
College of Social Work, Jalgaon



CamScanner